# लॉटरी

## नशिबाच्या संधीपल्याड

**एन. सुगालचंद जैन**, बी.ए.

अनुवाद : **पराग पाटील**

© सुगाल ॲण्ड दामाणी, २००६

सर्व हक्क संरक्षित. या प्रकाशनातील कोणताही भाग प्रकाशकाच्या लेखी पूर्वअनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत: इलेक्ट्रॉनिक, मेकॅनिकल, ध्वनिचित्रमुद्रित किंवा इतर कोणत्याही माध्यमात पुनर्मुद्रित वा पुनर्प्रसारित करण्यास मनाई आहे. या पुस्तकात अंतर्भूत असलेला बहुतांश मजकूर हा लॉटरी या विषयाशी संबंधित असून त्यापैकी काही माहितीचा भाग हा कायद्याच्या अन्वयार्थावर अवलंबून असू शकतो. या पुस्तकातील माहिती ही या विषयाशी निगडित वैधानिक आवश्यतेनुसार परिपूर्ण आहे, असा प्रकाशकांचा दावा नाही. ही माहिती या विषयाच्या कायद्यांवरील परिपूर्ण भाष्य आहे, असे समजू नये. या पुस्तकात कायद्याच्या अन्वयार्थासंबंधी विविध मतमतांतरे असू शकतात आणि त्यांच्या अचूकतेबद्दल लेखक कोणतीच जबाबदारी स्वीकारत नाही. या पुस्तकातील विधाने वा माहितीवर आधारित आश्वस्त होऊन एखाद्या व्यक्तीने बेपर्वाईने अथवा इतर कुठल्याही प्रकारे केलेल्या कोणत्याही कृतीतून झालेल्या नुकसान वा तोट्यास लेखक जबाबदार राहणार नाही.

**प्रकाशक :**

**सुगाल ॲण्ड दामाणी**

**क्र. ११, पोन्नाप्पा लेन, ट्रिप्लिकेन, चेन्नई - ६०००९४, दक्षिण भारत.**
**फोन : ०४४ - २८४८१३५४ य २८४८१३६६**
**ई-मेल :** sugalchand@yahoo.com / www.sugaldamani.com

**४०५, कृशाल कमर्शिअल कॉम्प्लेक्स,**
**जी. एम. रोड, शॉपर्स स्टॉपच्या वर**
**चेंबूर (पश्चिम), मुंबई - ४०००८९.**

**६/३५, डब्ल्यू. ई. ए. करोलबाग, न्यू दिल्ली - ११०००५**

**पुस्तकाच्या प्रती मिळण्याचे ठिकाण**

| | | |
|---|---|---|
| **न्यू दिल्ली** | : | **६/३५, डब्ल्यू. ई. ए. करोलबाग, न्यू दिल्ली - ११०००५** |
| **मुंबई** | : | **४०५, कृशाल कमर्शिअल कॉम्प्लेक्स, जी. एम. रोड, शॉपर्स स्टॉपच्या वर, चेंबूर (पश्चिम), मुंबई - ४०००८९** |
| **पुणे** | : | **ए विन्ग, कपिल टॉवर्स, दुसरा मजला, ४५, डॉ. आंबेडकर मार्ग, संगम पुलाजवळ, पुणे - ४११००१** |
| **नागपुर** | : | **ब्लॉक नं. टी-३, तीसरा मजला, श्रध्दा हाऊस, किंग्सवे, नीयर रेल्वे स्टेशन, नागपुर - ४४०००१** |
| **नाशिक** | : | **६-भगत प्लाझा, त्रिम्बक रोड, होटल पुजा इन्टरनेशनल के नीचे, जिल्हा परिषद के सामने, नाशिक - ४२२००१** |
| **औरंगाबाद** | : | **शोप नं. ३७, वी. के. हाईट्स, अंगुरी बाग, औरंगाबाद - ४३१००१** |

**किमत : रु. ५२५/-**

**मुद्रक :** Finalcopy (I) Pvt. Ltd., Mumbai.

सर्व लॉटरी विक्रेते आणि लॉटरी ग्राहकांना त्यांच्या
सामाजिक विकासासाठीच्या योगदानाबद्दल अर्पित

## लॉटरी : नशिबाच्या संधीपल्याड

इकडे आपण लॉटरी असावी की नसावी अशा विवादाने घेरलेलो असतानाच इंडियन एअरलाइन्सच्या स्वागत या नियतकालिकात स्पॅनिश लॉटरीच्या एल गोर्डो या लोकप्रिय खेळाच्या सप्टेंबर २००४ च्या सोडतीची एक जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. लॉटरी खेळाच्या अनुषंगाने आपण फार काही करत नसल्याने त्यांना भारतीय माणूस हा त्यांच्या लॉटरी खेळासाठी सहज लुभावता येणारा ग्राहक वाटतो आहे. ब्रिटिश सरकारनेही त्यांचे नागरिक इतर देशांची लॉटरी खेळू लागलेत असं लक्षात आल्यावरच आपली लॉटरी सुरू केली होती. नंतर या लॉटरीने त्यांच्या अर्थव्यवस्थेचा कायापालट केला. ब्रिटिशांनी मग लॉटरी पद्धतीत आणि लॉटरी ऑपरेशन्समध्ये कमालीची सुधारणा केली. आपण मात्र ही फळं मिळण्यासाठी नेमकी कशा पद्धतीने मार्गक्रमणा करावी याचा निर्णय करण्यासाठी थांबलोय का?

लॉटरीबाबत पहिला आक्षेप असा आहे की हा नशिबाचा खेळ आहे आणि हा जुगाराचाच एक प्रकार आहे. लॉटरीचे टीकाकार सांगतात की गरीब तो खेळत असल्याने त्यावर बंदी आणावी. हे खरंय की लॉटरी हा नशिबाचा खेळ आहे. पण त्याचप्रकारे फॉरवर्ड ट्रेडिंग, स्टॉक अॅण्ड कमॉडिटी ट्रेडिंग, शर्यत आणि परदेशी स्टॉक मार्केटमधलं बेटिंग, हेजिंग हेही नशिबाचेच खेळ आहेत. यातली गुंतवणूकही खूप मोठी असते आणि होणारा तोटाही चांगलाच प्रचंड असतो. तरीही या साऱ्यांना केवळ परवानगीच दिली जात नाही, तर उलट प्रशासनाकडून त्यांची पुनर्रचना करण्यात येत आहे. लॉटरीवरही बंदी न लादता तिची पुनर्रचना होणं गरजेचं आहे. लॉटरीमुळे विकासाच्या कार्यात आणि रोजगारीसाठीही जेव्हा प्रचंड योगदान मिळतं. हे सारं असूनही निंदेचं दान लॉटरीच्याच पदरात का? लॉटरीच नेहमी लक्ष्य का बनते?

आणखी एक मुद्दा असा की जुगाराची सहजप्रवृत्ती माणसात नैसर्गिकरित्या असते. भूक, लैंगिक गरजा, अधिकार गाजवणं आणि नशिबाची जोखीम घेणं या चार मूलभूत सहजप्रवृत्ती आहेत. भूक भागवण्यासाठी आपण धान्य पेरतो, झाडं वाढवतो आणि मग अन्नाच्या विविध प्रकारात त्याचं सेवन करतो. लैंगिक गरजांसाठीही आपण लग्नसंस्थेची स्थापना केलेली आहे. अधिकाराच्या प्रवृत्तीसाठी आपण श्रेणी आणि पदं तयार केली. जेव्हा आपण आपल्या मूलभूत सहजप्रवृत्तीना दाबण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्यांची इतर हिडीस रूपं लक्षणीयरित्या सामोरी येतात. उदा. जेव्हा मद्यविक्रीवर बंदी आणली गेली होती तेव्हा गावठी दारूचा व्यवसाय फोफावला आणि त्यात अनेक माणसं दगावली. तसंच जुगार ही एक नैसर्गिक सहजप्रवृत्ती आहे. ती दाबण्याचा प्रयत्न केल्यास, लॉटरी विरोधकांची लॉबी ज्या समाजघातक गोष्टींची चर्चा करते त्यापेक्षाही भीषण घातक परिणामांना सामोरे जाण्याची वेळ आपल्यावर येऊ शकते. लॉटरी ही या सहजप्रवृत्तीचा

उद्‌गार आहे. त्याला फक्त नीट वळण लावण्याची आवश्यकता आहे. लॉटरीचं स्वरूप ज्या घातक पद्धतीने रंगवलं जातं तसंच प्रत्यक्षात असतं तर आपल्या घटनाकारांनी तिचा उल्लेख संविधानात केलाच नसता.

दुसरा मुद्दा असा की लॉटरीतल्या अनिश्चिततेमुळे आणि जवळ जाऊन हुकल्याची भावना निर्माण झाल्यामुळे खेळाडूंना नैराश्य येऊन ते आत्महत्येला प्रवृत्त होतात. आत्महत्त्येच्या घटना केवळ लॉटरीशी निगडित नाहीत. बदलत्या जीवनशैलीमुळे कामाच्या ताणामुळे नैराश्य सर्वत्रच दिसतं. परीक्षेत पास न झालेल्या विद्यार्थ्यापासून ते सॉफ्टवेअर व्यावसायिक आणि सौंदर्यसम्राज्ञींमध्येही वय, लिंग, आर्थिक आणि सामाजिक पार्श्वभूमीच्या अपरोक्ष आत्महत्त्यांच्या प्रवृत्ती दिसून आल्या आहेत. मग एकट्या लॉटरीवर आक्षेप का? त्यावर साधा उपाय म्हणजे तिकिटांच्या मागे हेल्पलाइन नंबर, समुपदेशकांचे दूरध्वनी छापले जाऊ शकतात.

त्यानंतर येतो आरोग्याचा मुद्दा. दारू आणि तंबाखू यांची विक्री आजही सुरूच आहे. त्याचे आरोग्यावरचे दुष्परिणाम तर सर्वज्ञात आहेत. मद्य आणि तंबाखू हे आरोग्याला अपायकारक असूनही वैधानिक इशारा देऊन त्यांची विक्री चालू राहते. मद्य आणि तंबाखूच्या बाबतीत त्याच्या परिणामस्वरूप सरकारला हॉस्पिटल्स, डॉक्टर्स आणि औषधोपचारासाठी स्रोत निर्माण करावे लागतात आणि त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा लागतो. आकडेवारीनुसार तंबाखू सेवनामुळे आरोग्यावरचे अनेक घातक परिणाम सिद्ध झालेले असतानाही त्याच्या विक्रीला परवानगी आहे. लॉटरीचे दारू किंवा तंबाखूप्रमाणे आरोग्यावर काही परिणाम होत नसतानाही तिच्या बंदीसाठी वारंवार प्रयत्न केले जातात, हे अनाकलनीय आहे. बंदी हे उत्तर कसं असू शकतं? बंदी आणल्यानंतरही बेकायदेशीर गावठी दारूच्या भट्ट्या चालू राहतात आणि अशा अशुद्ध दारुच्या सेवनामुळे मृत्यूच्या घटनाही घडतात. लॉटरीच्या संदर्भातही काही अनियमितता आहेत. त्या छोट्या चुका सुधारण्याऐवजी आपण बंदीचं हत्यार वापरून एका कर्करोगाला आमंत्रण देतो आहोत. बंदीनंतरही बेकायदेशीररित्या हा व्यापार सुरूच राहतो आणि त्यामुळे सरकारवर तर विपरित परिणाम होतोच पण विकास प्रकल्पांनाही त्याची झळ पोहचते. लॉटरी विक्रीतून येणारा पैसा मग सरकारजमा होण्याऐवजी बेकायदेशीररित्या खेळत राहतो. लॉटरीमुळे लक्षावधी बेकार तरुणांना रोजगार मिळतो हे विसरता कामा नये. तीन दशकांच्या माझ्या लॉटरी व्यापारात विविध प्रसंगी तामिळनाडूत तीन वेळा लॉटरीवर बंदी आणली आणि ती पुन्हा सुरू केली गेल्याचं मी अनुभवलंय. यात भरडल्या गेलेल्या अनेकांनी लॉटरी पद्धतीत योग्य ते कायदे आणि नियम केले जावेत अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

जर लॉटरीचं व्यसन लागू शकतं तर कॉफी, सिगारेट, ब्राऊझिंग किंवा अगदी शॉपिंगचंही व्यसन लागू शकतं. आणि अतिप्रमाणात घेतलं तर नेक्टरही विषासारखंच काम करतं,

हेही आपल्या साऱ्यांनाच ठाऊक आहे. नव्याने झालेल्या संशोधनाअंती असंही सिद्ध झालेलं आहे की सक्तीची वर्तवणूक हीसुद्धा नंतर व्यसनात परिवर्तित होते. ही मुळात जीव-रासायनिक शास्त्रीय समस्या असते. त्यामुळे जुगार ही काही प्रत्यक्ष समस्या नाही. हेच गरिबी आणि लॉटरीच्या बाबतीत म्हणता येईल. आर्थिकदृष्ट्या दुबळा माणूस जरूर श्रीमंत होण्याचं स्वप्नं पाहात लॉटरी खेळतो. हां, जर तो दुबळा माणूस लॉटरीकडे खेळ किंवा करमणुकीचं साधन म्हणून न पाहता उत्पन्नाचं साधन म्हणून पाहू लागतो तेव्हा त्याच्या सभोवतालची सामाजिक-आर्थिक परिस्थिती बदलणं गरजेचं असतं न की लॉटरीवर बंदी आणणं. इथे समस्या आहे गरिबी, लॉटरी नाही.

लॉटरी विरोधकांचं म्हणणं आहे की गरीब लोक लॉटरीवर अधिक पैसे खर्च करतात. जेव्हा एखादा गरीब माणूस महिन्याला २००० रुपये कमावतो आणि त्याने जर १० रुपये लॉटरीच्या तिकिटावर खर्च केले, तर तो त्याच्या उत्पन्नाच्या ०.५ टक्के खर्च करत असतो. त्याचवेळी महिन्याला २०,००० रुपये कमावणारा माणूस तेवढीच रक्कम खर्च करत असेल तर तो आपल्या मिळकतीच्या ०.०५ टक्केच खर्च करत असतो. त्याचवेळी आपण सामान्य माणसाला लॉटरी खरेदी करू नको कारण तुझी मिळकत तेवढी नाही असं सांगू शकत नाही. त्यामुळे त्याच्या स्वातंत्र्याला बाधा आणल्यासारखं होईल. या समस्येवर तोडगा काढताना एनएएसपीएलचे अध्यक्ष एडवर्ड जे. स्टॅनेक यांनी सुचवलं की गरीब वर्गातील लोकांसाठी सवलतीच्या किमतीतली लॉटरी सुरू करावी.

सर्वसाधारण मत असं आहे की लॉटरीचे खेळिये हे निम्न उत्पन्न गटातील असतात आणि अधिकांश विक्रेत्यांची दुकानं ही या गटातल्या लोकांच्या वस्तीत असतात. अमेरिकेतील सर्व्हेक्षणानुसार बहुसंख्य लॉटरी खेळाडू हे मध्यम उत्पन्न गटातले असतात. कमी उत्पन्न गटात जर विक्रेत्यांची दुकानं असतील तर ती समान सेवा देण्याच्या हेतूनच निर्माण केली गेलेली असतात. कारण गरीब वस्तीत लोकसंख्येची घनता अधिक असते.

त्यानंतर येतो मुद्दा रोजगाराच्या संधीचा. तामिळनाडूमध्ये लॉटरीवर बंदी आणली गेली तेव्हा सहा लाख कुटुंबांचं उत्पन्नाचं साधन हिरावलं गेलं. जेव्हा बेरोजगारीचा प्रश्न भेडसावतो तेव्हा लॉटरी खूपच चांगला रोजगार पुरवते. अशिक्षित आणि शिक्षित अशा दोघांनाही या क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. कारण तळागाळातला विक्रेता होण्यासाठी काहीशे रुपयांचीच गरज असते. मग हा विक्रेता अडाणी असला तरीही काही फरक पडत नाही. भारतात अनेक विक्रेते हे अंध, अपंग किंवा वृद्ध आहेत. काही ठिकाणी तर शिक्षा भोगून सुधारलेले कैदीही लॉटरी विक्रेते म्हणून काम करतात. उच्चशिक्षितांनाही रिटेल एजन्सी स्थापून लॉटरी एक चांगला पर्यायी रोजगार देऊ शकते. चीनमध्ये १५ हजार निलंबित कामगारांचं सरकारने लॉटरी विक्रेते म्हणून पुनर्वसन केलं. अमेरिकेतील लॉटरी चालवणारे १,७८,००० किरकोळ विक्रेते आहेत. केरळमध्ये ३५००

नोंदणीकृत एजंट आहेत. संपूर्ण भारतात तर २५ लाख व्हेण्डर्स आहेत. हा व्यापार इतर पूरक उद्योगांनाही काम देतो, कल्याणकारी कामांसाठी निधी देतो आणि रोजगाराचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात सोडवतो. त्यामुळे लॉटरी या उद्योगाला त्याचं हे श्रेय द्यायलाच हवं.

असे अनेक मुद्दे घेऊन या पुस्तकाच्या माध्यमातून लॉटरी व्यवसायासंबंधित बरीच काही वस्तुस्थिती मांडायचा प्रामाणिक प्रयत्न मी इथे केला आहे. तो किती यशस्वी झाला आहे हे वाचकच ठरवतील. या पुस्तकाच्या निमित्ताने माझ्यासाठी सहकार्य तसेच पाठबळ उभे केल्याबद्दल मी या व्यापारातल्या माझ्या सर्व सहकाऱ्यांचे आणि मित्रांचे हृदयापासून आभार मानतो.

श्री. कमलेश विजय, माझे भागीदार श्री. जी. एन. दामाणी, श्री. पी. बी. छेडा, श्री. आर. एन. दामाणी, श्री. राजन छेडा आणि श्री. किशोर अजमेरा यांच्या पुस्तकासंदर्भातल्या सहकार्याबद्दल मी विशेष आभार मानू इच्छितो. माझे पुत्र श्री. प्रसनचंद जैन तसेच श्री. विनोद कुमार यांचा उल्लेख खासच करावा लागेल कारण माझ्या कल्पनेतल्या पुस्तकाला प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी खूपच पाठपुरावा केला. पुरातत्व आणि ऐतिहासिक संशोधन विभागाचे आयुक्त यांनी अनेक पुरातत्त्व दस्तावेजांसाठी परवानगी खुली केल्याबद्दल मी आभार मानू इच्छितो. पुरातत्त्व विभागातील वाचनालय तसेच संशोधन दालनाच्या सर्व पदाधिकारी तसेच सहाय्यक यांचा मी आभारी आहे. कोट्टायनच्या डी. सी. बुक्सचे श्री. डी. सी. रवी यांनी अनेक मौल्यवान माहितीची स्रोत पुरवले. लॉटरीसंदर्भातले छोटे किस्से तसेच श्री. किळ्ळकेमुरी यांच्या लॉटरीसंदर्भातल्या भूमिकेबद्दलही त्यांनी माहिती दिली. श्री. जेन्सी सॅम्युएल यांनी आवश्यक ते माहिती–संदर्भ जुळवून संकलित केले त्याबद्दल त्यांचे आभार. श्री. सुरेश भगत आणि श्री. अनंत शेठ यांनी महाराष्ट्र राज्य लॉटरीविषयी अत्यंत उपयुक्त माहिती उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्यांचेही आभार. हे पुस्तक भाषांतरित करून मराठी वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यासाठी अविश्रांत परिश्रम घेणाऱ्या श्री. राजन छेडा यांचे विशेष आभार मानणं गरजेचं आहे. तसेच या पुस्तकासाठी परिश्रमपूर्वक विशेष माहितीचे संकलन आणि सुयोग्य भाषांतर केल्याबद्दल श्री. पराग पाटील यांचेही मी आभार मानतो. त्याचप्रमाणे लक्षावधी लॉटरी व्यापारी, विक्रेते आणि खेळिये यांच्या सहभागाबद्दलही मी आभार व्यक्त करू इच्छितो.

लॉटरी या खेळाचे निंदक तसेच लॉटरी व्यापाराच्या पाठिराख्यांसाठीही हे पुस्तक नवी दृष्टी देणारे ठरावे, अशी आशा मी व्यक्त करतो. लॉटरी न खेळणाऱ्या पाठिराख्यांनाही या पुस्तकामुळे लॉटरी ही लक्षावधी लोकांना शिक्षण, आरोग्य आणि दोन वेळच्या जेवणाची सोय करते, या वस्तुस्थितीची जाणीव होईल.

सध्याच्या या जागतिकीकरणाच्या युगात इंटरनेटद्वारे अगदी दूरच्या बेटावरचा माणूसही

लॉटरीच्या खेळात सहभागी होत असताना आपण आपल्या नागरिकांना लॉटरी खेळू देण्याची परवानगी द्यायला नको का? आता तर ग्लोबल युनायटेड नेशन्स लॉटरी येऊ घातली आहे. या पार्श्वभूमीवर आपण आपल्या निर्णयांचा पुनर्विचार करू शकत नाही का? आशा आहे की हे पुस्तक लॉटरीच्या उद्दिष्टांबद्दल तसेच इतर पैलूंबद्दल लोकांना नवा आणि व्यापक दृष्टिकोन देईल.

एन. सुगालचंद जैन